# प्रस्तावना

15 ऑगस्ट साली भारत आंतरराष्ट्रीय पटलावर स्वतंत्र सार्वभौम राष्ट्र म्हणून उदयास आले. भारताने लोकशाहीचा स्विकार केला. भारताने लोकशाही रूजवली. शिवाय लोकशाही मुल्याची यशस्वीपणे जपणूकही केली. भारताने अन्नधान्य टंचाई, गरीबी, बेरोजगारी, या प्रश्नावर मात करून आर्थिक विकास साधला. भारताने लोकसंख्या वाढ ही समस्या न मानता या मनुष्यबळाचा यशस्वीपणे विकास केला. परिणामी माहिती तंत्रज्ञान (I.T), संरक्षण, अवकाश संशोधन या क्षेत्रात मुलगामी विकास करता आला. आज भारत अन्नधान्य उत्पादनात स्वयंपूर्ण आहे. तसेच माहिती तंत्रज्ञान , अवकाश संशोधन क्षेत्रात भारत एक प्रभावी सत्ता म्हणून पुढे आला. भारताच्या या विकास प्रक्रियेत दुष्काळ, पूर, भूकंप, भ्रष्टाचार या अडचणी आल्या. पण त्यावर भारताने यशस्वी मात केली. आपले आर्थिक व्यापारी हितसंबंध जोपासण्यासाठी जगातील बहूतेक राष्ट्रकडे मित्रत्त्वाचा हात पुढे केला. त्यात अमेरिका अग्रभागी होती.

शीतयुद्धाच्या काळात भांडवलशाही आणि लोकशाहीच्या संरक्षणार्थ साम्यवादाला प्रखर विरोध करणा ऱ्या अमेरिकेलाही शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर आपल्या परराष्ट्र धोरणात बदल करण्याची गरज जाणवू लागली. मुख्यत: अमेरिकेने शीतयुध्दोत्तर काळात आपल्या आर्थिक व व्यापारी हितसंबंधांना आंतरराष्ट्रीय राजकारणात महत्त्वाचे स्थान दिले. शिवाय शीतयुध्दानंतर सन

1991 साली अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्रध्यक्ष जॉर्ज बुश (सीनियर) यांनी नवीन विश्वरचनेची घोषणा केली. हया विश्वरचनेत अमेरिकेची भूमिका विश्वरक्षणकर्त्याची (Global Policeman) होती. म्हणजेच "जगात शांतता, सुरक्षितता टिकवणे, आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन करणा ऱ्या राष्ट्रांविरूध्द सामुहिक सुरक्षिततेच्या तत्वाअंतर्गत कारवाई करणे, अणुचाचणी बंदी, अण्वस्त्र प्रसारबंदी याची जबाबदारी अमेरिकेने घेतली." अमेरिकेचे हे बदललेले परराष्ट्र धोरण भारताच्या सहकार्याशिवाय कार्यान्वित होणे अशक्यच होते.

शिवाय श्रीमती इंदिरा गांधींनी भारताला सन 1972 च्या विजयाने आणि सन 1974 च्या अणुचाचणीने दक्षिण आशियातील प्रादेशिक सत्ता म्हणून प्रस्थापित केले. त्यामुळे अमेरिकेला भारताबरोबर संबंध सुधारणे गरजेचे वाटले. भारत-अमेरिका संबंध मैत्रीपूर्ण होऊ लागले. पण सन 1998 साली भारताने पोखरण येथे अणुचाचणी घेतल्याने पुन्हा तणाव निर्माण झाला. पण वाजपेयी सरकारच्या विशेष प्रयत्नाने 7 ते 8 वर्षात भारत-अमेरिका मित्र राष्ट्र म्हणून उदयास आले.

भारताने आपण अण्वस्त्र संपन्न झाल्याचे घोषित केल्यानंतर जे आण्विक धोरण जाहिर केले ते भारताने पाळले. भारत एक जबाबदार आण्विक राष्ट्र म्हणून पुढे आला. भारताने आपले आण्विक तंत्रज्ञान जगातील इतर राष्ट्रांना दिले नाही. तसेच विकलेही नाही. त्यामुळे या अण्वस्त्राचा जगाला तसेच अमेरिकेला धोका नसल्याचे सिद्ध झाले. भारताने अप्रत्यक्ष अण्वस्त्र

प्रसारबंदी कराराचे (NPT) पालन केले. सन 1998 च्या अणुचाचणीमुळे भारतावर लादलेली निर्बंधही उठविण्याची गरज होती. अणुइंधनाची कमतरता असल्याने अणुइंधनाची गरज ही भारताला होती. या सर्वाचा परिणाम म्हणून भारत-अमेरिका नागरी अणुसहकार्य कराराची घोषणा झाली.

यावर भारतात मतप्रदर्शनाला चर्चेला सुरवात झाली. त्यातून कराराच्या बाजूने व विरोधी असे दोन गट तयार झाले. कराराला विरोध करणारा डाव्या आघाडीचा विरोध इतका टोकाला गेला की, त्यानी संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारचा पाठिंबा काढून घेतला. त्यामुळे सरकारला अविश्वास ठरावाला सामोरे जावे लागले. त्यासाठी खास अधिवेशन बोलाविले गेले. या अधिवेशनात अशा काही घटना घडल्या की, ज्यांनी भारताच्या लोकशाही इतिहासाला काळिमा लावला. हा करार धार्मिक मुद्दा बनविण्याचाही प्रयत्न केला गेला. अशा प्रकारे बहुआयामी परिणाम करणारा हा करार ठरला आहे.

## संशोधन पद्धती :-

भारत-अमेरिका नागरी अणुसहकार्य करार हा भारताच्या आंतरराष्ट्रीय संबंधात मैलाचा दगड ठरणारी घटना आहे. अमेरिकेबरोबर एवढा महत्त्वाचा करार होईल असे कोणी विचारही करत नव्हते पण जागतिक परिस्थितीने हे करायला भाग पाडले. या कराराने आंतरराष्ट्रीय राजकारणाबरोबरच राष्ट्रीय राजकारणातही खळबळ उडवून दिली. भारताच्या

आजपर्यंतच्या परराष्ट्र धोरणाचे राजनितीज्ञास आणि सत्ताधारी वर्गाचे हे यश होते. अशा विविध गोष्टींनी हा करार महत्त्वपूर्ण असल्यामुळे हा विषय संशोधनासाठी मी निवडला.

आंतरराष्ट्रीय संबंधाच्या विषय शाखेच्या दृष्टीकोणातून या कराराचा अभ्यास आदर्शवादी सिद्धांत (Idealist theory) आणि वास्तववादी सिद्धांत (Realist theory) या दोन्ही दृष्टीकोणातून अभ्यासता येईल पण वास्तववादी दृष्टीकोणातून कराराचा अभ्यास किंवा विश्लेषण आर्थिक कसदारपणे करता येईल. हा करार पूर्णपणे वास्तववादी आहे. त्यात भारताचा आणि अमेरिकेचाही स्वार्थ साधला जाणार आहे. भारताची ऊर्जा समस्या काही प्रमाणात का होईना सुटेल हा करार दक्षिण आशियातील अस्थिरता व लोकशाही व्यवस्थाचा ऱ्हास, दहशतवादाने जगासमोर निर्माण केलेले प्रश्न, इराण आणि उत्तर कोरियाचा आण्विक कार्यक्रम, अमेरिकेला बदलत्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीत लागणारी भारताची मदत, अमेरिकेतील व्यापारी वर्गाचे हित, जागतिक तेल राजनयात भारताचा वाढता हस्तक्षेप या वास्तववादी पार्श्वभूमीवर हा करार अभ्यासला आहे.

हा अभ्यास करताना ग्रंथालय अभ्यास पध्दती (Library method) वापरण्यात आली आहे. तसेच संशोधनासाठी प्राथमिक आणि दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे. प्राथमिक साधनात करार मसुदा, राष्ट्रप्रमुखाची निवेदने, परराष्ट्र सचिवाची निवेदने, राजकीय पक्षाची मुखपत्रे इत्यादीचा वापर

केला आहे. तर दुय्यम साधनात मासिके, वर्तमानपत्रे, इंटरनेट, अनुवादित पुस्तके इत्यादींचा वापर केला आहे. हा विषय नवीन आहे. तसेच या विषयात दररोज भर पडत असल्यामुळे संशोधनात गुंतागुंत निर्माण झाली आहे. तरीही वेळेचे बंधन लक्षात घेवून हा अभ्यास पूर्ण केला आहे.